पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

-: प्रेसनोट :- **दि. २१/११/२०२६**

मुंबई पोलीस: तंत्रज्ञानाची वाटचाल!
तंत्रज्ञान संवर्धित विविध प्रकल्पांचे मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

मुंबई पोलीस दलाच्या तंत्रज्ञान संवर्धित विविध प्रकल्पांचे कार्यान्वयन व लोकार्पण आज मा. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे संपन्न झाले.

मेगासिटी पोलीसिंग योजनेच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत ५०,००० हून अधिक पोलीस अधिकारी व अंमलदार एकाच डिजिटल व्यासपीठावर जोडले जाणार आहेत.

प्रमुख प्रकल्प:

- **प्रत्यंचा (फ्युजन सेंटर):** पोलीस व इतर शासकीय यंत्रणांकडील विखुरलेली माहिती एकाच व्यासपीठावर एकत्र आणून, AI-आधारित विश्लेषणाद्वारे गुन्ह्यांमधील दुवे शोधणे, गुन्ह्यांची जलद उकल करणे आणि गुन्हे प्रतिबंध करणे.
- **नागरिक (Citizen) ॲप:** SOS मदत, परवानग्या आणि पोलीस सेवा थेट तुमच्या मोबाइलवर.
- **DigiID:** NFC व QR कोड असलेले स्मार्ट ओळखपत्र. त्यामुळे तोतया पोलिसांना आळा बसेल.
- **MPIS (मुंबई पोलीस एकात्मिक कार्य प्रणाली):** कागदविरहित, जलद आणि पारदर्शक पोलीस कामकाज.
- **संवाद ॲप:** पोलिसांचा स्वतःचा सुरक्षित मेसेंजर.
- **५०,००० टॅब्लेट:** पोलीस ठाणे आता पोलिसांच्या हातात.
- **मजबूत डिजिटल पाया:** सुरक्षित डेटा सेंटर, ४९० हून अधिक कार्यालयांचे नेटवर्क आणि १ कोटी जुन्या अभिलेखांच्या पानांचे डिजिटायझेशन.
- **Anti Narcotics Investigation and Forensic Van:** अंमली पदार्थ विरोधी कक्षासाठी घटनास्थळी संशयित पदार्थांची प्राथमिक ओळख, लाळ-नमुना तपासणी, वैज्ञानिक दृश्य नोंद आणि जप्त नमुन्यांच्या सुरक्षित हस्तांतरणासाठी एकात्मिक मोबाइल सुविधा.

या वेळी कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मा. श्री. मंगलप्रभात लोढा, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री मा. ॲड. आशिष शेलार, अपर मुख्य सचिव (गृह) श्रीमती मनीषा म्हैसकर-पाटणकर, मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती तसेच मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या प्रकल्पांमुळे मुंबई पोलीस दल अधिक आधुनिक, जलद आणि नागरिकाभिमुख होणार आहे.